# मुलांसाठी बाइबल

प्रस्तुत



# येशूसाठी भयंकर अशी वेळ


लेखक: Edward Hughes

अनुवादक: Rev. Shilas Gavit

रेखाचित्रकार: Byron Unger; Lazarus

रूपान्तरकार: M. Maillot; Sarah S.



60 गोष्टींतील 38 (पहिली)

**www.M1914.org**

***Bible for Children,*** *PO Box 3, Winnipeg, MB R3C 2G1 Canada*



परवाना (लाइसेंस): तुम्ही जोपर्यंत ही गोष्टविकत नाहीत, तोपर्यंत तुम्ही ती कॉपी किंवा मुद्रित करू शकता.


मराठी

Marathi

जेंव्हा येशूचा बाप्तिस्मा झाला, तेंव्हा देव बोलला होता. त्याने म्हटले, "हा माझा प्रिय पुत्र आहे. याच्याविषयी मी संतुष्ट आहे." देवाचा पवित्र आत्मा येशूवर कबुतरासारखा उतरला.



1

या घटनेनंतर लगेच, पवित्र आत्म्याने येशूला अरण्यांत नेले. येशू अरण्यात एकटाच होता.



2


चाळीस दिवसपर्यंत येशूने उपास केला. याचा अर्थ
असा की त्याने चाळीस दिवसपर्यंत काही खाल्ले
नव्हते. त्याला फार भूक लागली होती.
3


पवित्र शास्त्र असे देखिल सांगते की
तेथे हिंस्त्र पशू देखिल होते.
4


तेथे येशूची परिक्षा पाहण्यास सैतान आला.
फार–फार वर्षांपूर्वी देवाची आज्ञा पाळू नये म्हणून
ऐदेने बागेत त्याने आदाम व हवा यांची परिक्षा
पाहिली होती. आता येशूची
पारख होणार होती.
5


देवाचा पुत्र येशू, याची
देखिल सैतानाने परिक्षा
घेण्याचा प्रयत्न केला.
6


सैतान म्हणाला, "जर तु देवाचा पुत्र
आहेस, तर ह्या धोंड्यास भाकर हो
असे सांग." त्याला माहित होते की
येशूला भूक लागली आहे.
7


देवाचा पुत्र दगडाचे रुपांतर
भाकरीत करु शकतो हे त्याला
माहित होते. येशू सैतानाचे
ऐकून त्याप्रमाणे करेल का?
8


नाही! येशूने सैतानाची आज्ञा पाळली नाही. त्याऐवजी त्याने पवित्र शास्त्रातून म्हणजे देवाच्या वचनातून त्याला उत्तर दिले.
पवित्र शास्त्र
9
येशूने म्हटले, "मनुष्य केवळ भाकरीने जगेल असे नाही, तर देवाच्या मुखातून निघणाऱ्या प्रत्येक वचनाने जगेल."
पवित्र शास्त्र
10
मग सैतानाने येशूला यरुशलेम या मोठ्या शहरातील पवित्र मंदिरात; जेथे लोक देवाची भक्ति करतात तेथे नेले. सैतान आता पुढे काय करणार?
11
"जर तूं देवाचा पुत्र आहेस तर येथून खाली उडी टाक," असे सैतान म्हणाला, "कारण पवित्र शास्त्रात असे लिहिले आहे की, तुझे रक्षण करण्यास तो आपल्या दूतांस तुझ्याविषयी आज्ञा देईल."
12
"नाही." येशूने म्हटले, "असे देखिल म्हटले आहे की, तुझा देव परमेश्वर ह्याची परीक्षा पाहू नको."
पवित्र शास्त्र
13
सैतानाने पुन्हा एकदा प्रयत्न केला. तो येशूला शहराच्या बाहेर एका उंच डोंगराच्या टोकावर घेऊन गेला.
14













येशूसाठी भयंकर अशी वेळ

परमेश्वराची वाणी - बाइबल मधून गोष्ट

घेण्यात आली आहे

मत्तय ४, लूक ४

"तुझ्या वचनांच्या उलगड्याने प्रकाश प्राप्त होतो."
स्तोत्रसंहिता ११९:१३०

ईश्वराला माहित आहे की आम्ही वाईट गोष्टी केल्या आहेत, ज्याला तो पाप म्हणतो. पापाची शिक्षा मृत्यू आहे.

ईश्वर आमच्यावर इतके प्रेम करतो की क्रॉसवर मरण्यासाठी आणि आमची शिक्षा भोगण्यासाठी त्याने आपल्या पुत्राला येशूला पाठविले. येशू पुन्हा जिवंत झाला आणि स्वर्गात परत गेला! आता ईश्वर आमच्या पापांसाठी क्षमा करू शकतो.

जर तुम्ही तुमच्या पापांपासून मुक्ती मिळवू इच्छिता, तर ईश्वराला हे सांगा: प्रिय ईश्वरा, येशू माझ्यासाठी मेला आणि आता पुन्हा जगतो आहे यावर माझा विश्वास आहे. कृपा करून माझ्या जीवनात ये आणि माझ्या पापांसाठी मला क्षमा कर, जेणेकरून आता मला नवीन जीवन प्राप्त होईल आणि नंतर मी कायम तुझ्याबरोबर राहीन. तुझे मूल होऊन तुझ्यासाठी जगण्यास मला मदत कर. आमेन. जॉन 3:16

बाइबल वाचा आणि ईश्वराशी रोज बोला!